# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

जा.क्र./जमपा/आस्था/१९७) /२०२३
आस्थापना विभाग
दिनांक २८ / १० /२०२३

## सुचना पत्रक

जळगांव शहर महानगरपालिकेत तात्पुरत्या स्वरुपात ६ महिने (१७९ दिवस) करार पद्धतीने भरावयाच्या पदांसाठी प्राप्त अर्ज व अर्जदार यांनी केलेल्या स्वयंमुल्यांकनानुसार १:३ या प्रमाणात मौखिक चाचणीसाठी मुळ कागदपत्रे पडताळणीस अधीन राहून (मुलाखत) पात्र असलेल्या उमेदवारांची यादी जळगांव शहर महानगरपालिकेच्या www.jcmc.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

### मुलाखत कार्यक्रम खालीलप्रमाणे

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | मुलाखतीचा दिनांक | | मुलाखतीची वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ अभियंता(बांधकाम) | १० | ०१/११/२०२३ | पहिले सत्र सकाळी ११ ते २ पावेतो | सकाळी ११ ते १२.३० पावेतो |
| २. | कनिष्ठ अभियंता(पाणी पुरवठा) | ०३ | | | दुपारी १२.३० ते १.०० पावेतो |
| ३. | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | ०४ | | | दुपारी १.०० ते १.३० पावेतो |
| ४. | रचना सहाय्यक | ०४ | | | दुपारी १.३० ते २.०० पावेतो |
| ५. | आरेखक | ०२ | ०१/११/२०२३ | दुसरे सत्र दुपारी ३ ते ६ पावेतो | दुपारी ३.०० ते ३.३० पावेतो |
| ६. | विजतंत्री | ०६ | | | दुपारी ३.३० ते ४.३० पावेतो |
| ७. | वायरमन | १२ | | | दुपारी ४.३० ते ६.०० पावेतो |
| ८. | अग्निशमन फायरमन | १५ | ०२/११/२०२३ | पहिले सत्र सकाळी ११ ते २ पावेतो | सकाळी ११ ते ०१.०० पावेतो |
| ९. | आरोग्य निरीक्षक | १० | | | दुपारी १.०० ते २.०० पावेतो |
| १०. | टायपिस्ट / संगणक चालक | २० | | दुसरे सत्र दुपारी ३ ते ६ पावेतो | दुपारी ३.०० ते ६.०० पावेतो |

टिप :-

१ ) मूळ कागदपत्रांची पडताळणी ही मुलाखत सुरु होणेपूर्वी १ तास अगोदर करणेत येईल. मूळ कागदपत्रांची पडताळणी झालेनंतर व तशी खात्री झालेनंतरच पात्र उमेदवारास मुलाखतीसाठी मुलाखत कक्षात प्रवेश दिला जाईल.

२ ) सकाळ सत्रातील मुलाखतीस बोलविणेत आलेल्या उमेदवारांनी सकाळी १० ते ११ या वेळेतच उपस्थिती नोंदवायची आहे व कागदपत्रांची पडताळणी करावयाची आहे. मुलाखतीसाठी दिलेल्या वेळेतच मुलाखत घेण्यात येईल. विहीत वेळेनंतर उपस्थित होणाऱ्या उमेदवारांची उपस्थिती नोंदविण्यात येणार नाही. तसेच मुलाखत घेतली जाणार नाही.

३ ) दुपार सत्रातील मुलाखतीस बोलविणेत आलेल्या उमेदवारांनी दुपारी २ ते ३ या वेळेतच उपस्थिती नोंदवायची आहे व कागदपत्रांची पडताळणी करावयाची आहे. मुलाखतीसाठी दिलेल्या वेळेतच मुलाखत घेण्यात येईल. विहीत वेळेनंतर उपस्थित होणाऱ्या उमेदवारांची उपस्थिती नोंदविण्यात येणार नाही. तसेच मुलाखत घेतली जाणार नाही.

४ ) मुलाखत कार्यक्रमात आवश्यकतेनुसार अंशत: अथवा पूर्णत: बदल करणेचे अधिकार मा. आयुक्त व कर्मचारी निवड समिती यांनी राखून ठेवलेले आहेत. याची नोंद घ्यावी. तसा बदल

असल्यास वृत्तपत्रातून व महानगरपालिकेच्या संकेत स्थळावरुन प्रसिद्ध करणेत येईल. सबब उमेदवारांनी महानगरपालिकेच्या संकेत स्थळाला वेळोवेळी भेट देणे हितकारक राहिल.

**स्थळ** :- जळगांव शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीच्या लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल टॉवर येथील मजला क्रमांक २

सदर मुलाखतीस वेळेवर खालील आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित राहावे. सदर मुलाखतीस उपस्थित राहणेसाठी आपणास कोणताही प्रवास खर्च अनुज्ञेय नाही.

१. शैक्षणिक अर्हता गुणपत्रिका व प्रमाणपत्र (मुळ कागदपत्रे)
२. शाळा सोडल्याचा दाखला / जन्म प्रमाणपत्र / S.S.C. बोर्ड सर्टीफिकेट
३. अनुभवाचा दाखला (शासकिय /निमशासकिय संस्था/महामंडळे इ. कडील) (मूळ कागदपत्रे)
४. जातीचा दाखला / जात वैधता प्रमाणपत्र
५. अर्जदार विवाहित असल्यास लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र
६. रहिवास पुरावा :- आधार कार्ड

**टिप** :- १) उमेदवाराची कागदपत्र अवैध किंवा बनावट / खोटी आढळून आल्यास उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

27/10/23

(अविनाश गांगोडे)
**उपायुक्त (सा.प्र.)**
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

(मा. अध्यक्ष तथा आयुक्त यांचे मान्यतेने)